आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
९ ऑगस्ट २०२६ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- देशव्यापी हर घर तिरंगा अभियानाला आजपासून प्रारंभ

- झारखंडमध्ये आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ९८ टक्के मागण्यांवर सहमती, मात्र इतर मागण्यांसाठी आंदोलन सुरूच

- बिगर जीवाश्म इंधनावर आधारित वीजनिर्मितीत भारतानं गाठला ३०० गिगावॉटचा टप्पा

- मध्य प्रदेशात झालेल्या अपघातात ६ जणांचा मृत्यू

आणि

- आशियाई कनिष्ठ भारोत्तोलन अजिंक्यपद स्पर्धेत महाराजन अरुमुगपंडियन यानं पटकावलं रौप्यपदक

**<><><><><>**

देशभरात आजपासून हरघर तिरंगा हे अभियान सुरू झालं आहे. येत्या १७ तारखेपर्यंत चालणाऱ्या या मोहिमेत यंदा 'वंदे मातरम' या राष्ट्रीय गीताच्या दीडशेव्या वर्धापन दिनाचंही औचित्य असणार आहे. उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी आज अंदमान आणि निकोबार बेटांवरून हर घर तिरंगा मोहिमेचा प्रारंभ केला. आपला तिरंगा हा आपला अभिमान आहे, त्यामुळे सर्वांनी हर घर तिरंगा मोहिमेत उत्साहाने सहभागी होऊन विकसित भारत घडवण्याच्या कार्यात सहभागी व्हावं असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज पुद्दुचेरी इथल्या मुरुगा थिएटर सिग्नलजवळ 'हर घर तिरंगा' यात्रेला हिरवा झेंडा दाखवून सुरुवात केली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज राष्ट्रकुल स्पर्धांमध्ये पदकांची लयलूट करणाऱ्या भारताच्या चमूची भेट घेतली आणि या उत्तम कामगिरीबद्दल त्यांचं अभिनंदन केलं. 'जो खेलेगा, वह खिलेगा', असा संदेश त्यांनी समाजमाध्यमावर शेअर केलेल्या चित्रफितीत दिला आहे. या स्पर्धेत भारतानं १३ सुवर्णपदकांसह ३९ पदकांची कमाई केली होती.

**<><><><><>**

झारखंडमधल्या भरती परीक्षांमध्ये झालेल्या कथित अनियमिततेविरोधात आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ९८ टक्के मागण्यांवर सहमती झाल्याची माहिती मंत्री सुदिव्य कुमार सोनू यांनी आज दिली. याअंतर्गत झारखंड लोकसेवा आयोगाची १४ वी पूर्वपरीक्षा आणि २०२३-२५ मधल्या प्रलंबित परीक्षा रद्द करण्याला सरकारनं सहमती दिली असल्याचं त्यांनी सांगितलं. यासोबतच आर्थिक अनियमिततेची सक्तवसुली संचालनालया मार्फत चौकशी करणं, गुन्हेगारी स्वरुपाच्या प्रकरणांची सीआयडी मार्फत चौकशी करणं आणि ९० दिवसांत आरोपपत्र दाखल करण्यासाठी जलदगती न्यायालय स्थापन करण्यालाही सरकारनं मंजुरी दिल्याचं ते म्हणाले. परीक्षा व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी तज्ज्ञांची एक समिती स्थापन करणार असल्याचंही सोनू यांनी सांगितलं. मात्र झारखंड कर्मचारी निवड आयोगाची संयुक्त पदवीधर स्तरीय परीक्षा रद्द करण्याच्या तसंच सीबीआय चौकशीच्या मागणीवर सहमती होऊ शकली नाही. यामुळं आंदोलन सुरूच राहील असं विद्यार्थ्यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर झारखंड लोकसेवा आयोगाच्या अमिता भट्टाचार्य, जमील अहमद आणि अनिमा हांसदा या तीन सदस्यांनी आज आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. राज्य सरकार या तिघांची सीआयडी चौकशी करणार आहे. या प्रकरणी झारखंड लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष एल. खियांगते यांनी यापूर्वीच आपल्या पदाचा राजीनामा दिलेला आहे.

**<><><><><>**

बिगर जीवाश्म इंधनावर आधारित वीजनिर्मिती क्षमतेत भारतानं ३०० गिगावॅटचा टप्पा गाठला आहे. ३१ जुलै २०२६ पर्यंत देशात स्थापित बिगर जीवाश्म वीज निर्मिती प्रकल्पांची क्षमता ३०० गिगावॅटच्या पलिकडे गेली असल्याचं नव आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयानं कळवलं आहे. यात सौर ऊर्जेचं प्रमाण १६४ पूर्णांक ५९ गिगावॅट, पवन ऊर्जेचं प्रमाण ५८ पूर्णांक १४ गिगावॅट, जलविद्युत उर्जेचं प्रमाण ५७ पूर्णांक २४ गिगावॅट, जैव ऊर्जेचं प्रमाण ११ पूर्णांक ७५ गिगावॅट तर अणुऊर्जेचं प्रमाण ८ पूर्णांक ७८ गिगावॅट इतकं आहे. यामुळे आता एकूण वीज निर्मिती क्षमतेत बिगर जीवाश्म इंधनावर आधारीत वीज निर्मितीचा वाटा ५४ टक्क्यांपेक्षा जास्त झाला आहे. हवामान बदलावरच्या उपाययोजनाअंतर्गत २०३० पर्यंत ५०० गिगावॅट क्षमतेचं उद्दिष्ट गाठण्याच्या दिशेनं हे यश एक महत्त्वाचं पाऊल ठरलं आहे.

**<><><><><>**

परकीय गुंतवणूकदारांची भारतीय बाजारपेठेतली गुंतवणूक सातत्यानं वाढत असून ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यात त्यांनी १२ हजार ९२१ कोटी रुपये भारतीय बाजारांमध्ये गुंतवल्याचं सीडीएसएलच्या अहवालात म्हटलं आहे. जुलै महिन्यात हा आकडा २० हजार २०० कोटी इतका होता. मार्च ते जून या काळात परदेशी गुंतवणूकदारांनी मोठ्या प्रमाणात पैसे काढून घेतले होते. त्यानंतर सलग दुसऱ्या महिन्यात ही मोठी गुंतवणूक देशात आली आहे.

**<><><><><>**

विविध उच्च न्यायालयांच्या ४ न्यायाधीशांची मुख्य न्यायाधीश म्हणून पदोन्नती करायची शिफारस सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायवृंदाने केली आहे. अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायाधीश न्यायमूर्ती महेशचंद्र त्रिपाठी यांची मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून, तर मुंबई उच्च न्यायालयाचे प्रभारी मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती रवींद्र घुगे यांची कोलकाता उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून शिफारस करण्यात आली आहे. दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश न्यायमूर्ती व्ही. कामेश्वर राव यांची पाटणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून, तर पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाचे न्यायाधीश न्यायमूर्ती अश्वनी कुमार मिश्रा यांची त्याच न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून पदोन्नती करायची शिफारस न्यायवृंदाने केली आहे.

**<><><><><>**

मध्य प्रदेशातल्या धार जिल्ह्यात आज दुपारी झालेल्या अपघातात ६ जणांचा मृत्यू झाला. उज्जैनहून गुजरातकडे जाणारी कार कंटेनरला आदळल्यानं हा अपघात झाला आणि कारमधले सर्व ६ जण जागीच ठार झाले. कंटेनरच्या चालकाला पोलिसांनी अटक केली असून पुढचा तपास सुरु आहे.

**<><><><><>**

झारखंडच्या रामगढ जिल्ह्यात एका खासगी पोलाद कारखान्यात झालेल्या स्फोटात किमान ९ जण जखमी झाले. यापैकी दोघांची प्रकृती गंभीर आहे आणि त्यांच्यावर रांचीतल्या खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. कारखान्यातल्या भट्टीत स्फोट झाल्यामुळे गरम

धातू अंगावर उडून हे कामगार जखमी झाल्याची माहिती कारखान्याच्या मुख्य निरीक्षकांनी दिली.

<><><><><>

आशियाई कनिष्ठ भारोत्तोलन अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या महाराजन अरुमुगपंडियन यानं रौप्यपदकावर नाव कोरलं. पुरुषांच्या ६५ किलो वजनी गटात त्यानं स्नॅच प्रकारात १२८ किलो आणि जर्क प्रकारात १५७ किलो असं एकंदर २८५ किलो वजन उचललं. व्हिएतनामचा होआंग थाच यानं २९१ किलो वजन उचलून सुवर्णपदक जिंकलं.

<><><><><>

ब्रिक्स २०२६च्या भारताच्या अध्यक्षपदाअंतर्गत ब्रिक्स सदस्य देशांच्या स्पर्धा प्राधिकरणांच्या प्रमुखांची बैठक आज राजस्थानमध्ये उदयपूर इथं झाली. भारतीय स्पर्धा आयोगानं या बैठकीचं आयोजन केलं होतं. बाजारपेठांमध्ये निकोप स्पर्धेला प्रोत्साहन देणं, तसंच स्पर्धेसंबंधीचे कायदे आणि धोरणांच्या अनुषंगानं उदयाला येत असलेल्या आव्हानांवर मात करण्यासाठी परस्पर सहकार्याला बळकटी देण्याच्या मुद्यावर या बैठकीत चर्चा झाली. या बैठकीत ब्रिक्स सदस्य देशांच्या स्पर्धा प्राधिकरणांचे प्रमुख आणि वरिष्ठ प्रतिनिधी सहभागी झाले होते.

<><><><><>

कोलकात्याच्या आर. ज. कार रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालयात २ वर्षांपूर्वी झालेल्या बलात्कार आणि हत्येप्रकरणी नव्याने तपास करायची घोषणा पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनी केली. या प्रकरणातल्या पीडितेची आई आणि भाजपाच्या आमदार रत्ना देबनाथ यांनी नव्यानं तपास करायची विनंती करणारं पत्र आपल्याला लिहिलं होतं, त्यानुसार मुख्य सचिव आणि तज्ज्ञांशी चर्चा करून हा निर्णय घेतल्याचं अधिकारी यांनी सांगितलं. या प्रकरणाचा तपास करायचं कर्तव्य बजावण्यात पोलीस अपयशी ठरल्याचा दावा त्यांनी केला.

<><><><><>

'फुकेत'हून दिल्लीला येत असलेल्या एअर इंडियाच्या विमानाशी संबंधित घटनेची चौकशी 'विमान अपघात तपास संस्था' करत असून, या घटनेचं वर्गीकरण 'गंभीर' या श्रेणीत करण्यात आल्याचं नागरी हवाई वाहतूक मंत्रालयानं म्हटलं आहे. ४ ऑगस्ट रोजी दिल्ली

दिशेने येणारं हे विमान आकाशात 'क्रूझ', म्हणजेच ‘स्थिर’ अवस्थेत असताना अचानक सुमारे ३०० फूट खाली आलं होतं. यावेळी हादरे बसल्यानं विमानातले काही प्रवासी आणि कर्मचारी जखमी झाले. काही वेळानं विमान स्थिर होऊन सुरक्षितपणे दिल्ली विमानतळावर उतरलं. त्यानंतर प्रमाणित कार्यपद्धतीनुसार, दोन्ही वैमानिकांनी ‘मनोव्यापारांमध्ये बदल घडवणाऱ्या पदार्थांचं सेवन केलं होतं का, याची चाचणी करण्यात आल्याचं मंत्रालयानं सांगितलं. या प्रकरणाचा तपास पूर्ण होईपर्यंत दोन्ही वैमानिकांना निलंबित करण्यात आलं आहे.

<><><><>

एका खासगी कंपनीचं प्रशिक्षण विमान आज बारामतीच्या धावपट्टीजवळ कोसळलं. या अपघातात जीवितहानी झालेली नाही. हा अपघात दुपारी साडे १२च्या सुमाराला झाला. या प्रकरणाचा प्राथमिक तपास नागरी विमान वाहतूक संचालनालयाचं हवाई सुरक्षा पथक करेल, अशी माहिती नागरी विमान वाहतूक मंत्रालयानं दिली. या अपघाताची नेमकी कारणं काय होती, याचा शोध हे पथक घेणार आहे.

<><><><>

होर्मूझची सामुद्रधुनी पुन्हा खुली करण्यापूर्वी अमेरिकेनं आपल्या काही मागण्या पूर्ण करायला हव्यात, असं इराणनं म्हटलं आहे. इराणचे सुरक्षा प्रमुख मोहम्मद बागेर झोलगाद्र यांनी आज या मागण्या जाहीर केल्या. अमेरिकेनं नौदलाची नाकेबंदी हटवावी, लष्करी तुकड्या मागे घ्याव्यात, आणि युद्ध पूर्णपणे थांबवावं, इत्यादी मागण्यांचा यात समावेश आहे. या संघर्षामुळे झालेल्या नुकसानीची अमेरिकेने भरपाई द्यावी, तसंच इराणची गोठवलेली मालमत्ता मुक्त करावी, या मागण्याही इराणनं केल्याचं इराणच्या सरकारी माध्यमांनी सांगितलं.

<><><><>

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी संघर्षग्रस्त गाझासाठी मांडलेला १५ मुद्द्यांचा प्रस्ताव इस्रायलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेतान्याहू यांनी फेटाळून लावला आहे. जोपर्यंत हमास खरोखर शस्त्रास्त्रं खाली ठेवत नाही, तोपर्यंत इस्रायलचं सैन्य आणि नागरिकांना असलेला धोका दूर करण्यासाठी लढत राहू, सैन्य मागे घेणार नाही, अशी भूमिका त्यांनी आज मंत्रिमंडळ बैठकीत मांडली.

<><><><>

रशिया आणि युक्रेनने काल रात्रभर परस्परांवर केलेल्या हल्ल्यांमध्ये एकंदर ७ नागरिक मारले गेले तर अनेक जण जखमी झाल्याची माहिती स्थानिक सूत्रांनी दिली. रशियाच्या सीमावर्ती भागात युक्रेनच्या ड्रोन हल्ल्यात ५ जण ठार झाले, तर २४ नागरिक जखमी झाले. तर रशियाच्या क्षेपणास्त्र हल्ल्यात २ जण ठार झाले, तर १३ जण जखमी झाल्याचं स्थानिक सूत्रांनी सांगितलं.

//<><><><><>//